# आहुति



प्रभाकर बिडवे

REFBK-0011240
REFBK-0011240

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५१०
१९६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८२१५ वि: ७६।०५
क्रमांक ७९७१८ नों: दि: १०।३।६५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११२८०

# आहुति

✦ प्रभाकर बिडवे ✦

REFBK-0011240
REFBK-0011240

कुलकर्णी ग्रंथागार पुणे २

किमत एक रुपया

प्रकाशक :
पंडित अनंत कुलकर्णी,
कुलकर्णी ग्रंथागार,
१८६ शनवार, पुणें २.

प्रथमावृत्ति : २४ नोव्हेंबर १९६०

सर्व हक्क :
सौ. अनुराधा प्रभाकर बिडवे

मुद्रक :
ना. अ. मेहेंदळे,
जीवन मुद्रणालय,
५५१ बुधवार, पुणें २.

तीर्थरूप वडिलांचे चरणीं —

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

माझ्यांतील मी मधलें –
माझें मन :
असेंच कधींतरी
बनतें पिसाट,
– आणि विचारीत सुटतें सुसाट
त्याच्याच मनाला :
कसल्या तरी
गूढ शंका;
ज्यांना नसतो
या मर्त्य जगांत...
आदि...मध्य...आणि अंत !

तें मनही मग :
देतें उत्तर...केवळ उत्तर...
असत नाहीं ज्याला –
आदीची उत्पत्ति,
मध्याची स्थिति,
– आणि अंताची लय !

तीं भोंवळलेलीं उत्तरें :
लागतात फेर धरायला
माझ्यांतील मनाभोंवतीं,
आणि जातों बनून मीही –
भोंवळलेला एक भोंवरा,
ज्याला श्रवणीं येत नाहीं :
ॐकार;
जाणवत नाहीं...मकार;
बाधा करीत नाहीं...हकार :
दिसूं लागते त्याला :
ज्ञाताच्या पलीकडे,
एकाच झेपेंत...कवेंत घेतो तो :
भूताच्या पिशाच्याला,
वर्तमानाच्या वृत्तीला,
भविष्याच्या भवितव्याला;
– आणि सोडवीत जातो गणीत –
या विश्वाच्या गूढतेचें,

अनंताच्या अंताचें;
ज्याचा आरंभ होतो शून्यांतून –
आणि ज्याची इतिश्री......
– तीही होते शून्यांतच !

तीच भोंवळ घेते गति,
तोच भोंवरा घेतो लय,
तेंच मन पाहूं लागतें :
विशाल विश्वाची एक कथा –
मर्त्य मानवाची अमर व्यथा !

–आणि त्याला दिसूं लागतें...

उदास श्यामल धूसर रेषा
निळावंतीवर करिती नर्तन,
अपरेच्या खिन्न पटलावर,
गालित गात्र भास्कर :
शेवटचा निरोप घेतो आहे;
प्रकाशाला अंधाराचें वरदान-
देतो आहे !
– निळ्या सागरांत
आपल्या सर्वस्वाची आहुति घेतो आहे !

प्रकाशाचें एक पर्व जातें संपून –
आणि सुरूं होतें निशेचें गीत !

शहारलेला वारा :
सागर लाटावर गुदगुल्या करीत
खिदळतो आहे...चोरपावलानें;
क्षितिजाच्या रेषेवर –
शांत झोपलेले निळे डोंगर :
स्वप्नें चाळवीत चाळवीत
घेऊं लागतात –
धुक्याची निळी जाग;
प्रकाशाच्या लाजेची
शराबी धुंदी
गालावर घेऊन : लाजरा चंद्र–
कळयांच्या कानांत कुजबुजतो आहे;
पायांतल्या घुंगुरांना :
मुक्याचें व्रत देऊन
तारकांचें नृत्य चाललें आहे;
“ एक पाय दह्यांत
एक पाय दुधांत...”
गीत लयींत घुमतें आहे;
पटपट सावलीचा खेळ;
गेला आहे रंगून –
रात्रींच्या गहिऱ्या नशेंत !

मदिरेशिवाय कैफ :
चराचरांना चढला आहे,

मदिराक्षीशिवाय :
अनंग येथें रंगला आहे,
कारणाशिवाय :
कार्य तिथें घडत आहे;
– वाळूचें घडचाळ :
कणाकणानें...रितें होत...
चाललें आहे !

अजाणताच होते आहे :
निशेला उत्तर रात्रीची बाधा,
विरामतो –
चैतन्याचा अचानक खेळ;
– आणि
भयाण...भेसूर...शांतता...
धिमी पावलें टाकीत
दाखवूं लागते...भग्न उग्रता !
त्याच निश्चलतेंत–
लागतो दिसाया
काळ्या कबऱ्या रंगाचा –
भव्य प्रासाद :
पहातां जयाला उरांत भरते –
एकच धडकी,
त्याच प्रासादाच्या
भव्य मनोऱ्यांतून :

साद येतसे,
मरगळलेल्या मनाला आणीत –
भीतीची जाग !

धूसर प्राचीच्या
प्रकाशाला पाठ देऊन –
राहतो उभा एक दूत;
अपरेकडें पसरून बाहू–
आहे सांगत...तार स्वरांत...

" प्राचीला प्रकाशाचा गर्भ राहिला आहे,

त्यांत ' ती ' वाढते आहे,
तिच्या भाळीं–
उद्यां सकाळीं :
तिच्या जन्माचा काळ लिहिला आहे,
तिचें येणें अटळ आहे...
नव्हे...तिला आलेच पाहिजे.
प्राचींतून तिचें येणें आहे,
अपरेकडें तिचें जाणें आहे;
प्रश्न नाहीं तिच्या येण्यांत,
उत्तर नाहीं तिच्या जाण्यांत,
ती येणार आहे...ती येणार आहे !

तिचें स्वागत झालेंच पाहिजे,
तिला निरोप दिलाच पाहिजे.
तिचें येणें तुमच्यासाठीं...
तिचें जाणें तुमच्यासाठीं,
तुमच्यासाठीं तिची वाट...
तुमच्यासाठीं तिचा थाट,
कैंकदा :
ती अशीच आली आहे,
आली तशी गेली आहे;
उद्यां फिरून येणें आहे :
– नवीन स्वागत करणें आहे !"

दूताच्या गीताला :
निर्झराचे साद,
अचल ठाकल्या पर्वतराईचे –
भावशून्य पडसाद;
– आणि
बधिऱ्या गात्रीं तयांना ऐकत–
जुनाट...कुजकीं...सडलेलीं अंडीं
मेलेल्या गर्भाची–
अपरा उबवितें,
मुर्दाड मनांत
वांझ मातृत्वाची...आशा गोंजारीतें;
– आणिक प्राचीच्या
गर्भार मुखावर :


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 28218 वि: 89.04
1490 नों: दि: 20-2

नव्या जीवनाच्या...नव्या चाहुलीची...
प्रभा फाकते !

त्याच प्रासादांत :
सुरू होईल आतां –
तिच्या येण्याचा जन्मोत्सव !

ती अशी येईल :
कीं...बघणाराला वाटावें –
तिचें येणें नवीन आहे.
प्रकाशाचें तेज ती ल्याली असेल,
चैतन्याची मदिरा ती प्याली असेल,
तिच्या अंग-प्रत्यंगांत –
अनंगाची कांति रसरसली असेल,
तिच्या डोळ्यांत –
एक मादक धुंदी तरारत असेल,
छटेल...मिष्किल हास्य :
तिच्या गालाच्या खळींत खिदळत असेल,
तिच्या भुवईंत :
छद्मीपणा कमान होऊन राहिला असेल,
हलकेच घालील ती
तिच्या ओठांनीं
एक मादक फुंकर –
तुमच्या अजाण गालावर,

आणि तिच्या मोरपंखी हातांचीं...
ती अग्निशिखेसारखी निमूळतीं बोटें–
अलगद ठेवील ती
तुमच्या डोळ्यावर;
– आणि अशी नजरबंदी झाल्यावर :
तिच्या लाडिक भाषेंत--
ती म्हणेल :

"तुझ्याच-साठीं मी आलें आहें,
युगायुगाचा दीर्घ कालचा–
तुझा माझा स्नेह आहे,
जडलें आहे तुझ्यावर :
माझें अजाण मन,
केली आहे तुझ्यावर :
मी माझी भोळी प्रीत,
तुझाच छंद मला लागला आहे;
तुझाच ध्यास मनानें घेतला आहे.

आठवतें का ?
गेल्या जन्मांत :
तुझी माझी जोडी जमली होती,
तुझी माझी फुगडी रंगली होती,
कदंबाच्या त्या फांदीवर –
तुझा माझा झोका चढला होता,

भान नव्हतें मला :
माझ्या हातांतील बिल्वर
घसमुसळेपणानें...
तूं फोडला होतास,
रुसलें होतें मी...
तुझ्यावर लटके लटके,
आव आणला होता मी...
खोटें खोटें रडण्याचा,
माझ्या रुसव्यानें :
तूं हंसला होतास...नि...
लाडे लाडे...
एक साखरचुंबा तूं मला दिला होतास;
रडतां रडतां मी हंसलें होतें;
बघतां बघतां मी फसलें होतें,
माझ्या मोकळ्या केसांतून...
तुझीं बोटें :
अलगद अलगद फिरत होतीं,
माझ्या गात्रागात्रांना...
तुझ्या कुशीची :
– एक गहरी ऊब मिळत होती !

आठवते का ?
वर्षेची पहिली सर येतांच :
मातीचा गंध लुटला होता,

तुझ्या वेड्या हट्टानें...
जलवंतींत तूं मला भिजविले होतेंस,
अशी आलेली होऊन...
तुझ्या पावलावर पाऊल ठेवून...
तुझ्यामागें मी आलें होतें,
थांबलों होतों :
तेव्हां आपण...
तुझ्या त्या लाडक्या...
गुल्मोहराखालीं;
आडोशाच्या आधारानें :
खट्याळपणानें...
तिथें तूं माझा गाल कुस्करला होतास,
मी घाबरलें होतें...
गोंधळलें होतें...बावरलें होतें...
माझें ऊर धडधडत होतें...
— मात्र...
तुझ्या मिष्किल डोळ्यांतून :
माझ्यासाठीं...
अभयाचें दान ओसंडत होतें !

तें सारें सारें...
अजून मला आठवतें आहे,
त्याची धुंदी :
मला अनावर होते आहे.

– आणि तुझ्यासाठीं...
होय रे... तुझ्याचसाठीं...
माझें वेडें मन
पागलपणा घेतें आहे !

मी आलें आहे...आलें आहें...
तुझी माझी –
ही युगायुगाची प्रीत :
पुन्हां एकदां जागवायला...
मी आलें आहें...मी आलें आहें !"

त्या प्रसादांत :
तिच्या येण्याची सारी तयारी सज्ज असेल,
तिच्या स्वागताचीं सूक्तें :
तिच्याच भक्तांनीं लिहून ठेवलीं असतील,
ती आलेली पहातांच–
साऱ्या सूक्तांचा उद्घोष :
एका सुरांत केला जाईल;
पूर्वेंतून :
तिच्या येण्याचा जयजयकार होईल;
अपरेवर :
कुणीतरी मिटून गेल्याचा :
भास होईल;
अनंत-काल दबून राहिलेला :

एक स्वास मुक्त होईल.
दहा दिशांना आव्हान देत...
अंधाराच्या आभासाला :
उखाणे घालीत...पायाखालीं घेत...
दोन्हीं हातांनीं...
प्रकाशाचें तेज उधळीत उधळीत :
एका वेगळया दिमाखांत...
एका आगळया चालींत...
कांहींशा मस्तींत...कांहींशा धुंदींत...
उद्दाम पावलें टाकीत...
– ती या प्रासादांत येईल !

तिला पाहून दिपलेले,
विवेकापासून सुटलेले,
तिचेच भक्त म्हणूं लागतील :

" हिच्यासारखी हीच आहे,
हिला विश्वांत तुलना नाहीं !

हिचें सारें भव्य आहे,
हिचें सारें दिव्य आहे,
सत्याचें सृजन हिच्यांत आहे,
शिवाचें पूजन हिच्यांत आहे,
सुंदरांत ही सुंदर आहे,

मंगलांत ही मंगल आहे,
हिच्या पावलांत तेज आहे,
हिच्या चालींत गति आहे,
हिच्या नजरेंत आशा आहे,
हिच्या येण्यांत प्रगति आहे.
भूत हिनें पचविला आहे,
वर्तमान हिचा गुलाम आहे,
भविष्य हिला भीत आहे.
हिच्यांत सारें नवीन आहे.
अशी ही महान आहे...महान आहे...
– हिच्यासारखी हीच आहे!"

येणार आहे ती ज्या प्रासादांत :
आहे जुना –
अगदीं पुराणा :
ज्यानें पाहिलीं आहेत वर्षें :
सेकंद होऊन आलेलीं...गेलेलीं...!
अनेक वर्षाकालांत :
जो न्हाऊन निघाला...भिजून निघाला...,
कैक शारदरात्रीं :
त्यानें जागून काढल्या,
हेमंताच्या गूढतेंत :
हा मूक राहिला,
शिशिराची शिरशिरी :

त्याला नाहीं जाणवली,
ग्रीष्माच्या दाहांतही पोळून...
तो थंड राहिला,
आणि वसंताच्या वैभवालाही :
तो संन्यस्थ झाला.
त्याच्या जन्माची कथा :
कुणाला माहीत नाहीं,
त्याचें कूळ कधीं कुणी...
शोधलेलें नाहीं,
त्याचें मूळ कधीं कुणी...
पाहिलेलें नाहीं,
तो इथेंच आहे...इथेंच आहे...!
त्याचें वय वर्षांनीं मोजतां येत नाहीं,
त्याचा इतिहास :
शतकानें सांगतां येत नाहीं;
तो अजर आहे...
तो अमर आहे...
तो तिच्यासाठीं उभा आहे,
– आणि तीही :
त्याच्यासाठींच येणार आहे !

ती अनेकदां आली इथें :
पण त्याचें येणें एकदांच आहे,
तिचीं अनेक रूपें :

तटस्थ डोळ्यांनीं त्यानें...
कितीदां तरी आहेत पाहिलीं...
बुबुळांची हालचाल न करतां;
आहे खेळविलें त्यानेंच तिला :
कटिखांद्यावरती;
साजरा केला तिचा जन्मोत्सव...
आणिक त्यानेंच :
तिला अखेरचे दिले निरोप —
भावशून्य नजरेनें...
निखळूं न देतां एकही अश्रू !

तिच्या या असल्या —
येण्याजाण्यांत त्यास वाटली नाहीं :
कधीं उत्सुकता...कसलें गांभीर्य...;
त्याच्या लेखीं होतें—
अकारण सारें...भ्रमाचेंच वारें...;
पाहिलें सारें...
ऐकिलें सारें...
साहिलें सारें...
— आणिक शेवटीं :
जातो विसरून
तिचे खेळ सारें...कालांत विरणारे !

त्याच प्रासादाच्या :
उंच मनोऱ्यांत...

कधीं उठतात शब्दांचे घुमारे,
पत्थर झालेलें तयाचें काळीज–
लागतें बोलाया :
एक गूढ सत्य;
शब्दांच्या लाटा –
पोलादी भितींना देतात धडक;
– आणिक निघतो
एक प्रतिध्वनि :
" ती येणार असेल तर तिला येऊं द्या !

११२४०

तिच्या येण्यांत नाहीं नवेंपण,
ती जशी येणार आहे...
ती तशीच जाणार आहे,
तिचें येणेंच मुळीं जाण्यासाठीं आहे;
ती येणार असेल तर तिला येऊं द्या !

मला माहीत आहे:
ती त्याच मार्गानें येणार आहे...
आणि जाणारही आहे त्याच मार्गानें,
त्या मार्गाशिवाय :
माहीत नाहीं तिला दुसरा मार्ग,
ठरून गेली आहे तिची कक्षा...
भ्रमण आहे तिचें त्याच कक्षेंतून,
ताऱ्यांच्या तोऱ्यांत ती येऊं पहाते :

पण धूमकेतूची संज्ञा ती लेऊन जाते !
म्हणूनच म्हणतो :
ती येणार असेल तर तिला येऊं द्या !"

शब्दांतून शब्द,
ध्वनींतून ध्वनी,
वाढत जातें प्रतिध्वनींचें वर्तुळ;
होतसे गर्दी अनंत वर्तुळांची –
ज्याच्यांत लागतें हळूंच दिसाया :
तिचें स्पष्ट रूप.
मनाला आलेला भासाचा मोहोर
लागतो गळाया :
जसा पहाटेला वितळे अंधार.
गात्रागात्रांना –
फुटूं लागतात प्रज्ञेचे डोळे :
ज्या नयनांनीं पाहिलें होतें
गुलाब कांतीच्या...मेंदीच्या नखाच्या...
हिमगौरीचे मोहक चाळे;
त्याच नेत्रांना येतसें कळून –
मधांत भिजली :
जहरी हास्याची विषारी धार.
होताच जिचा–
अलवार स्पर्श शहारलें होतें
एकदां अंग;

त्याच स्पर्शांतून आतां जाणवते;
जाळती आग –
– आणिक कळतें :
तिचें स्वरूप :
तिच्या जन्माआधीं,
तिच्या येण्याआधीं !

जयांनीं तिला पाहिली आहे.
नसतो तयांना :
तिच्या लावण्याचा फसवा मोह;
तिच्या या असल्या सुंदरतेला–
हंसतात सारे कुरूपतेनें;
नसते तयांना खुळी आसक्ति :
तिच्या भोगाची;
– कारण त्यांना
ठाऊक असतें :
तिचें हें शरीर...
(ज्यावर कांती चंद्रकांताची...)
त्याच्यांत आहे :
मुर्दाड मन...भावशून्य मन...!
ज्याला कधींही असत नाहीं :
हळव्या भावांची...हृद्य अनुभूति.
– आणिक ज्यांत
होते आहे वाढ :

कुजक्या गर्भाची...सडक्या वीर्याची...!
तिच्या अस्तित्वाची :
तयांना येते तीव्र शिसारी !

असें तिचें रूप आहे :
अशीच ती येणार आहे !

ज्यांनीं तिला पाहिलें आहे :
ते फेडतात तिचें हें
जरतारी वस्त्र...मोहक अस्त्र...
आणि दाखवितात –
उघडें करून तिचें सत्य रूप.
ती इतकी भेसूर असेल–
तिच्यांत एवढी कुरूपता असेल...
असें कुणाला वाटलें नाहीं;
तिच्या ओंगळतेची कल्पना–
कधीं कुणाला आली नाहीं;
पण तिच्या भुलावण पाडणाऱ्या...
निरीला हात घालणारा :
अखेर कुणीतरी येतोच आहे,
तिचें संभ्रमाचें वस्त्र —
अखेर कधींतरी फेडतोच आहे;
— आणि मग ती :
जशी वाटली तशी पुन्हां वाटत नाहीं.

तिच्यांतील सत्य...
सत्य उरत नाहीं;
ती असत्याची गर्भार असते.
तिच्यांतील शिव...
शिव रहात नाहीं;
अशिवांत तिचें पाऊल वाकडें पडलेलें असतें.
तिच्यांतील सुंदर...
सुंदर उरत नाहीं;
पतितत्वानें ती असुंदर झालेली असते.
तिच्यांतील मंगल...
मंगल मानावेंसें वाटत नाहीं;
कारण तिनें :
अमंगलाशीं व्यभिचार केलेला असतो.
अशी ती...
किळसवाणी...लाजीरवाणी...
नकोशी होते !
जी एकदां :
हवीहवीशी वाटत होती,
घ्यावी घ्यावीशी वाटत होती,
तीच आतां —
आपल्याच कृत्यानें :
नको नकोशी होते !
आणि तरीही...
तिच्या बेगडी रूपाला मोहीत झालेले,

अतृप्त वासनांनीं अनंग पिसाळलेले,
तिचे...तिच्या येण्याची वाट पहात...
संधीसाधूपणा करणारे,
सखीचे लाल—
तरीही म्हणतात :

" हिच्यासारखी हीच आहे
हिला विश्वांत तोड नाहीं ! "

ज्यांनीं हिला पाहिलें आहे —
ते सांगतात :

" हिचा मातीशीं विद्रोह आहे ! "

वर्षाकालांत :
पहिल्या वर्षेची सर येऊन गेल्यावर
मातीच्या सुगंधाबरोबर —
धावायचें तिला रुचत नाहीं;
गंधवतीच्या मादक गंधाचा :
ती मत्सर करिते;
या भिजलेल्या ओल्या श्यामल मातीला—
चुंबायचें तिला जमत नाहीं;
तिला नसते वर्षाजलाची तहान;
पार्थिव म्हणून...

माझ्या लाडक्या वसुंधरेचा :
ती अव्हेर करिते;
या विश्वाला ती असत्य मानते :
आणि सत्य मानून —
त्या ब्रह्माची पूजा करते !

वसंताचा वसंतोत्सव,
ग्रीष्माच्या दाहकतेंतही असणारी माधुरी,
रिमझिमत्या वर्षेचें मोहक नर्तन,
शरदाचें शीत शुभ्र चांदणें,
हेमंताची मुग्ध गूढता,
आणि शिशिराची गोड शिरशिरी :
या साऱ्यांना —
ती असत्य मानून अव्हेरिते !
वसंताच्या वृक्षराजीचा सोहळा,
तें धुंद होऊन–
आम्रमंजिरीवर चाललेलें गुंजन,
पंचमांतून सप्तमांत —
चढणारें कोकिळेचें कूजन,
बालकाच्या तळहाताची तळपायाची :
लाली घेऊन आलेली–
हळुवार वाऱ्यावर झुलणारी चैत्रपालवी,
याच्यांत तिला काव्य वाटत नाहीं :
हें सारें ती असत्य मानते !

इंद्रधनूचा प्राचीवरचा –
सप्तरंगी गोफ,
निर्झरणीचें :
पैंजण बांधल्या पायाचें रुमझुमणें,
ऐटदार मोरपिसाऱ्याचा डौलदार दिमाख,
प्रपाताचा बेदरकार उच्छृंखलपणा,
सरितेची मीलनोत्सुकता,
धूसर धुक्याची झिरझिरीत चादर,
प्रातःकालीन दंवाची पानापानांतील पखरण,
याच्यांत तिला काव्य वाटत नाहीं :
हें सारें ती असत्य मानते !

शारद रात्रीच्या चंद्रिकेची मादकता,
शांत जलाशयांत –
जलांत हलणा ी गहिरी कुजबूज,
सोनचांफ्याची उन्मादक धुंदी,
भरांत आलेल्या केवड्याची मस्ती,
पारिजाताची भुलावण पाडणारी –
अल्वार मिठी,
या साऱ्यांत तिला काव्य वाटत नाहीं :
हें सारें ती असत्य मानते !
तिची दृष्टि ऐहिकावर नाहीं :
तिला ओढ आहे अज्ञात विश्वाची !
नको आहे तिला इथली समृद्धि;
चिंता आहे तिला :

पलिकडील जगांतील तृप्तीची;
इथलें सारें तिला असत्य वाटतें –
कल्पनेंतलें ..
दृष्टीपलीकडील...
तिला सत्य वाटतें;
आणि म्हणूनच ती :
उदास आहे...अविकारी आहे... !
तिला इथलें चैतन्य नको आहे :
कारण तिला वाटते ही सारी माया !
ब्रह्म वाटतें सत्य...
आणि :
जगत् वाटतें मिथ्या !

आम्हांला सृजनाचें वेड आहे :
पागल आहोंत आम्ही निर्मितीचे,
प्यारी आहे ही श्यामल माती,
हवी आम्हाला रिमझिमती जलवंती,
आज स्वागत आम्हाला करायचें आहे:
मातींतून वर येणाऱ्या उन्मेषाचें;
आज सत्कार आम्हाला करायचा आहे :
हिरव्या वर येणाऱ्या–
लवलवत्या तृणपात्याचा !

तें तिला रुचायचें नाहीं,
त्यावर तिची श्रद्धा नाहीं,

कारण...
तिचा मातीशीं विद्रोह आहे !"

ज्यांनीं हिला पाहिलें आहे –
ते सांगतात :

" हिचें सत्य पारखून घ्या
कारण तिनें सत्याशीं सौदा केला आहे !

पोरक्या झालेल्या पांडवांना :
मूठभर अन्नासाठीं–
हिनेंच महाग केलें.
सुईच्या अग्रावर मावणाऱ्या जमीनीला–
विरोध केला हिनेंच.
शकुनी मामाच्या फाश्यांत –
झाली होती हीच एकजीव,
सत्यवचनी धर्मराजाला :
अवमानाचा...अधिक्षेपाचा...दारिद्र्याचा...
रस्ता दाखवायला !

आणि ही सत्याची उद्‌गाती :
अर्जुनाला विजय मिळावा म्हणून,
सर्वश्रेष्ठ धनुर्धराचें ब्रीद राखावें म्हणून,
अहिल्येशीं व्यभिचार करणाऱ्या-

कामी इंद्राचा अवतार घेऊन :
भिक्षूच्या वेषांत -
आली होती :
कवच कुंडलांची भीक मागायला –
दानशूर कर्णाच्या दारांत.
आणि हिनेंच केला अवसान घातकीपणा :
कुरुक्षेत्राच्या त्या समरांगणांत,
गिळलें कर्णाच्या रथाचें चक्र –
बुभुक्षित भूमीचें रूप घेऊन,
कर्णावर सोडले पाशवी बाण :
अर्जुनाच्या भात्यांतून...भ्याडपणानें...!
सत्याचा अपलाप करून :
हिनेंच केला जयद्रथाचा वध :
आणि अश्वत्थाम्याला :
चिरंजीवित्वाचा शाप देऊन –
त्याच्या माथ्याला जखम केली...
अविनाशी :
तीहि हिच्या सत्यशीलतेनेंच !
स्वप्नांत दान देणाऱ्या –
सत्यवचनी हरिश्चंद्राची :
अमानुष परीक्षा पाहिली हिनेंच !
शिबी राजाच्या मांडीचें मांस :
कुतरडायला तयार झाली होती हीच !
श्रीयाळाचें बाळ :

उखळांत घालून निर्दयपणानें –
हिनेंच कांडून पीठ केलें...गीत गात...!
सती साध्वी सीतामाईची –
सत्वपरीक्षा हिनेंच घेतली :
आणि दंडकारण्याचा रस्ता हिनेंच दाखविला...
एका फाटके कपडे धुणाऱ्या :
परटाच्या इच्छेखातर !

ती तिज्या सत्यानें श्रेष्ठ ठरली :
पण तिचें सत्य असें आंधळें आहे,
न्यायाचा ताजवा त्याला दिसत नाहीं –
सत्याची पारख त्यांत असत नाहीं !

– आणि म्हणूनच ते म्हणतात :
तिनें सत्याशीं सौदा केला आहे !"

ज्यांनीं हिला पाहिले आहे –
ते सांगतात :

" हिची नीति बेगडी आहे !

तिच्या नीतीला :
अनीतीचा कुबट वास आहे,
सत्यासत्य ती जाणत नाहीं,
विवेकाचा पोंच तिला असत नाहीं !

सूर्याचें व्रत सांगून :
कुमारी कुंतीला हिनेंच फसविलें होतें !
जलवंतींत सळसळणाऱ्या...
मासळीच्या कांतीवर भाळलेल्या :
शंतनूच्या शरिरांत ही –
कामवासनेच्या रूपांत शिरली होती;
आणि मत्स्यगंधेचा गंध –
हिनेंच लुटला होता !
पांच पतींचें भाग्य लाभलेल्या :
पांचालीच्या मनांत...
कर्णाची अभिलाषा हिनेंच निर्माण केली !
इंद्राशीं रत झालेल्या अहिल्येला :
हिनें अशीच भुरळ पाडली होती !
अनसूयाचें सात्विक रूप पहाण्याचा–
चावटपणा :
ब्रह्मा...विष्णु...महेशाकडून...
हिनेंच करविला होता !
सर्वश्रेष्ठ कुलाला
कुलदीपक लाभावा म्हणून :
महाभारताच्या प्रारंभीं –
व्यभिचाराचें पर्व...
हिनेंच लिहिलें आहे !

हें सारें तिला मान्य आहे.
गायिले आहे तिनें तयांच्या...


मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 26218 दि: ...

नीतीचे गोडवे;
सांगून जगाला –
यांतही आहे एक आदर्श :
सामान्य मनाला –
न पेलणारा...न झेपणारा !
यांतही आहे दडून बसलें –
शाश्वत नीतीचें...शाश्वत तत्व...
नाहीं जयाला :
स्थलकालाची सीमा !

हें सारें आम्हाला अगम्य आहे,
याला नकलीपणाचा एक रंग आहे,
अनीतीच्या व्यवहारांत...हें...
नीतीचें ढोंग आहे !

म्हणूनच ते म्हणतात :
हिची नीति बेगडी आहे !"

ज्यांनीं हिला पाहिलें आहे :
ते सांगतात :

"ती एक छंदी आहे...फंदी आहे...!

तिच्यांत एक लहर :
अधून मधून फिरते आहे;
नसांत तिच्या :
एक कलंदर उच्छृंखलपणा –
वावरतो आहे !
रोमचा इतिहास :
हिच्या अग्निशिखेसारख्या –
निमूळत्या बोटांनींच लिहिला;
निरोसारख्या नराधमाला ।
जन्म हिनेंच दिला..
आपल्या कुजलेल्या गर्भांतून;
असा राजा कधीं झाला नाहीं,
भविष्यांत त्याचें होणें नाहीं,
सत्तेच्या कैफाची धुंदी :
तिनेंच त्याला पाजली होती;
त्याच्या सारंगीच्या तारा :
तिनेंच आपल्या काळ्याशार...
मादक केसांच्या केलेल्या होत्या;
त्याच्या प्याल्यांत :
हिच्याच गालांतील गुलाबी रंग...
शराब होऊन हिंदकळत होता;
आपल्याच हातांनीं :
रोमला वणवा तिनें लावला होता;
आणि ज्वालांचें नर्तन करीत होती :

ती सुद्धां तीच होती...तीच होती...!
नीरोच्या डोळ्यांतून :
नक्राश्रू ढाळत होती —
ती सुद्धां तीच होती...तीच होती !

– आणि त्या स्पार्टाचे डोंगरमाथे :
हिच्याच पावलानें पूनीत झाले;
तिथल्या दऱ्या :
हिनेंच फेकून दिलेल्या –
कोंवळ्या अर्भकांच्या रक्तानें लाल झाल्या;
कारण...
तिला तिथें आणायचें होतें
बलवानांचें राज्य;
लहरीखातर :
तिला करायचा होता त्यांच्याशीं –
संभोगाचा एकांत !

ग्रीसच्या नकाशाचा रंग :
अजून ओला आहे.
तिथेंही तिनें केले होते
कलाविलास.
तिच्या अंगप्रत्यंगांतून होती ओसंडत :
एक अनोखी झळाळी;
तिला काव्याच्या मदिरेचा कैफ चढला होता;

शास्त्राच्या तक्तावर :
ती झाली होती सम्राज्ञी;
— पण एक वासना मनांत झुरत होती,
व्यभिचाराची भावना तिथें रंगत होती,
मस्तवाल झालेला :
तिचा पाय घसरला...
तो कधीं ?
तें तिलाच कळलेंही नाहीं !
तक्त झालें उपडें...
आणि अशेष रूप झाली ती...
तें कधीं ?
तिचें तिलाच कळलें नाहीं !

त्या नाईलच्या तीरावर :
एकाकाळीं उबविलीं होतीं हिनें—
आपलीं अंडीं...गिधाडांच्या गराडयांत...!
आंस होती तिच्या मनांत :
एक दिवस असा येईल —
जीविताचें सोनें होईल;
कोंवळ्या अर्भकांच्या चिमुकल्या पंखांत :
एक नवी ऊब येईल,
एक नवीन त्राण येईल,
आणि उभारतील तीं आपले पंख :
एका झेपेंत...

साऱ्या जगाला कवळायला,
क्षितिजाची सीमा तोडायला,
— अखेर सारें स्वप्न ठरलें,
डोळ्यासमोर अंडीं सारीं कुजून गेलीं,
भुकेल्या गिधाडांनीं :
लुसलुसीत मांसाची...
गोड गोड मेजवानी केली,
आणि उरलें केवळ...निर्जीव कवच...
त्यांचीं थडगीं :
आज अजून उभीं आहेत
पहात आपुलीं प्रतिबिंबें...
नाईलच्या पाण्यांत !

तेंच पॅलेस्टाईन :
तिथें गेली ही...आसुसलेली...
नव्या रूपांत :
नवीन कांहीं द्यावें म्हणून...
तिचें दैव तिच्या पाठिशीं होतें :
अपयशाची ती ठेकेदार होती.
काफरांच्या मेळाव्यांत :
हिला तिथें घ्यावी लागली हार;
ज्या पावलानें ती आली तिथें —
तेच पाय तिला काढते घ्यावे लागले !

अशाच एका नितळ पहांटे :
एका गवळयाच्या घरीं
गुरांच्या गवाणींत...
तिनें जन्म दिला होता एका अर्भकाला !
आकाशांत पूर्वेवर :
एक निळा तारा प्रकाशमान झालेला—
तिनें चोरून पाहिला होता;
वाटलें होतें तिला :
या ताऱ्याचें तेज –
त्रिखंड व्यापून उरेल आतां;
त्याचा स्निग्ध स्नेहल प्रकाश :
स्थल कालाच्या सीमा –
उल्लंघील आतां;
तिला वाटलें :
आपली कूस उजवून निघाली,
युगायुगांचें मातृत्व आज –
पदरीं आलें !
– पण झालें मात्र विपरीत !
तिच्या आशा तिच्यादेखत...
भंगून गेल्या,
तिला वाटलें :
तिचा झाला अधिक्षेप;
ती पिसाट झाली...सुसाट झाली...
तिच्या विवेकाचा कणा :

कधीं मोडून पडला –
तें तिलाच कळलें नाहीं;
ज्या वेदना घेत :
तिनें त्याला दिला होता जन्म,
त्याच वेदना –
तिनें अनुभवल्या पुन्हा एकदां :
लांकडाचा तो प्रचंड क्रूस करतांना;
लोखंडी खिळ्यांना धारेचें पाणी देतांना;
काट्यांचा नक्षीदार मुकुट गुंफतांना !

तिनें आपल्याच हातानें –
ज्या हातानें :
तिनें त्याचें जावळ कुरवाळलें होतें;
त्याच हातांनीं –
त्या क्रूसावर त्याला मारला ठोकून
खिळ्या खिळ्यांनीं : त्याच्या शरिराची...
चाळणी करीत !
ज्या कोवळ्या गालांचीं :
तिनें कैक चुंबनें घेतलीं होतीं,
तोच आतां–
लाल रक्तांत थबथबला होता !
तिनें ज्याच्या बाललीला :
कुतूहलानें पाहिल्या होत्या,
तिनेंच तो–

गॉलगोथाचा डोंगरमाथा
त्याच्या रक्तानें रंगलेला पाहिला होता :
तृषार्त नेत्रांनीं...
घेत घेत एक गहिरी तृप्ति !
‘ ईश्वर त्यांना क्षमा करील. ’
हें त्याचें अखेरचें सूक्त –
तिनें एकलें होतें,
आणि तिच्या डोळ्याच्या कडा
ओलावल्या होत्या :
तिच्या जिवणींत
एका हास्याची पुसट रेषा फुलवीत !
– पण तिच्या
असल्या छद्मी रडण्याला अर्थ नव्हता :
कारण...
तो तिचा लाडेला आतां उरला नव्हता !

असेंच एकदां तिनें :
सिंधूच्या खोल पाण्यांत
आपलें रूप न्याहाळलें होतें;
मोहनजदरोच्या अन् हरप्पाच्या
घरांत तिनें संसार थाटला होता;
गंगेच्या पाण्याला
हिचा कोवळा पाय एकदां लागला होता;
आणि कुरुक्षेत्रावर

हिनें महिषासुरमर्दिनीचें...
महाकालीचें...
रूप घेतलें होतें :
भोंवळलेल्या अर्जुनाला
उपदेशाचे घुटके पाजले
ते सुद्धां हिनेंच !

ही खरीच लहरी आहे !

हिनें भल्या रात्रीला
सिद्धार्थाला दिली अचानक जाग;
आणि कवटाळलें त्याला
आपल्याच बाहुपाशांत.
विषय वासनेला आणि उपभोगाला
विटलेल्या त्यानें :
शोधला होता बोधी वृक्षाचा निवारा;
तिथेंही तिनेंच :
दिला होता त्याला आसरा;
– आणि सोऽहम् ज्ञानाचा भव्य पिसारा !

तिच्या लहरीला उरली नाहीं सीमा...
ज्ञानाच्या प्रकाशांत मंतरून गेलेल्या
त्या बुद्धाला :
तिनेंच दिला –

एका डुकराच्या मांसाचा तुकडा
चघळायला !

हिनें सॉक्रेटिसाचा केला –
अमानुष अंत.
प्रेमवेड्या मीरेच्या हातांत
हिनेंच दिली विषाची वाटी !

हिनें कांहीं केलें नाहीं
असें कांहीं उरलें नाहीं;
हिनें सारे उदय पाहिले
हिनें सारे अस्त पाहिले;
हिनें स्वत:लाच जन्म दिले
आणि स्वतःचें अंतही...
हिनेंच पाहिले !

म्हणूनच सांगतात :

ती एक छंदी आहे...फंदी आहे...!
तिच्यांत एक लहर
अधून मधून फिरते आहे,
नसांत तिच्या :
एक कलंदर उच्छृंखलपणा वावरतो आहे !

अशीच ती –
कैक युगांतून आली आहे.
आली तशी गेली आहे.
या भव्य प्रासादांत :
ती कैकदां राहिली आहे,
पण प्रासाद मात्र तोच आहे,
ती जरी तीच असली,
तरी...
तिचीं रूपें आहेत भिन्न,
अशी ती बहुरूपी आहे,
कांहींशीं छंदी आहे,
कांहींशीं फंदी आहे !
कांहींशीं लहरी आहे !

प्रासादावरचा तो दूत
तिच्या येण्याची ग्वाही देतो आहे :
ती उद्यां येणार आहे,
नवें सोंग सजणार आहे,
नवें नाटक रंगणार आहे,
तें जसें सुरू होईल
तसेंच अखेर होईल बंद !
त्याला :
आदि आहे...
मध्य आहे...

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम २८२१८ वि: काव्य
क्रमांक ७४९० नों: दि: १०-२-६१

अंत आहे.
त्याचा आरंभ
उल्हासानें रंगलेला आहे;
त्याचा मध्य :
गांभीर्यानें जडावला आहे;
आणि अंत :
शोकामधून विरला आहे;
या नाटकाचा आरंभ :
दिसत असला जरी सुखात्म –
तरी अंतीं आहे तें शोकांत !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

हिच्या नटव्या रूपाला :
हिचे भक्त वाहवा देतील,
हिच्या मार्गावर :
हिचे चोपदार–
हिचे ललकार गात पुढें धावतील.
पण इतरांचें काय...?
ज्यांना ती माहीत आहे :
ज्यांना हिच्या बेगडी रूपाचा आहे थांग,
ज हिच्या लहरीच्या लाटेवर
झाले आहेत तरंगणारे बुडबुडे,
त्यांना हिची भीति आहे
त्याचें काय ?

तिचें असें हें अवेळीं येणें :
त्यांना वाटतो
एक महाअपशकून.
कारण :
ती त्यांना जाळीत जाते...
तुडवीत जाते...छेदीत जाते...!
तिचें प्राचींतून येणें –
आणि अपरेंत जाणें :
एक महान संकट ठरतें आहे.
ती येतांना आपल्या मार्गावर
शिलगावीत येते :
अनंत होमकुंडें...यज्ञकुंडे...
ज्यांत पडते आहे आहुति :
अजाण अज्ञान –
मानवाच्या मनाची;
होते आहे चिता
युगानुयुगें जपलेल्या
आशाआकांक्षांची...
पूजित आलेल्या साऱ्या श्रद्धांची !
त्यांत स्वास्थ्याची होते होळी,
शांतीचा दिला जातो बळी,
भक्ति आणि प्रीतीची
होत आहे रांगोळी,
– आणि ठरते;

या महामानवाच्या महाजीवनाची
एक आहुति !

आणि असें कांहीं पाहिलें म्हणजे :
विचाराला भोंवळ येते,
मनाला ग्लानी येते,
आणि फिरूं लागतो देहाचा भोंवरा :
गती घेत...लय घेत...
आणि त्याच्या भोंवतीं होतात निर्माण
अनंत प्रश्नांचीं अनंत वर्तुळें.
ज्याला आरंभ असत नाहीं,
ज्याचा मध्य दिसत नाहीं,
ज्याचा अंत भासत नाहीं !

आणि शेवटीं :
त्या अनाहत नादांतून—
येतें एक उत्तर :

" येणार असेल ती तर
खुशाल तिला येऊं द्या !

तिचें जीवित अल्प आहे,
तिचा प्रवास स्वल्प आहे,
ती इथें आली तरी

अनंतांतून आलेल्या,
अनंतांत जाणाऱ्या,
अजर आणि अमर,
या मानवी मनावर
तिला तिचें अधिराज्य --
कधींच कधींच...
गाजवितां येणार नाहीं.
विश्वव्यापी...अविनाशी...
या मनाला--
कवेंत तिला :
कधींच कधींच घेतां येणार नाहीं.
तिचा प्रवास :
तिला पुन्हां --
थांबवावा लागणार आहे !

-- आणि अशाच वेळीं :
तें ऊर्ध्वगामी मन...
तिच्या येण्याजाण्याची खंत न करतां,
अनंताचा आपला प्रवास :
क्रमीत राहील...क्रमित राहील...!

-- येणार असेल ती तर :
खुशाल तिला येऊं द्या !"

REFBK-0011240

दा. क्र. ११२४०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८२१४ वि: ४७०५
क्रमांक १५१० नों: दि: १५-२-५